**सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित जी. ए. कुलकर्णी जन्मशताब्दी वर्षाची सांगता : कथा अभिवाचन कार्यक्रमात लातूरकर रुचिबद्ध**

मन:पूत भावभावनांच्या आंदोलनांचे नेमके व चित्रमय शब्दरेखन करणाऱ्या कथांतून मनोविश्वातील घडामोडींसह वृत्ती, प्रकृती व विकृती यांच्यातील अद्भुततेचा वेध घेत, सामान्य माणसाच्या सुखदु:खाच्या विश्वासह स्वप्नपूत विचारविश्वाचीही उकल करणाऱ्या कथाविश्वाचे दर्शन घडवणाऱ्या, ...

मराठी साहित्यात गूढकथांचे व मनगर्भ भावाभिव्यक्तींचे दालन खुले करून त्याला अभिजात वैभव प्राप्त करून देणाऱ्या, ...

भावाभिव्यक्तीबरोबरच उच्च भाषाभिव्यक्तीचा प्रत्यय देणाऱ्या, ...

वाचनाचे वेड लावून मनाच्या समृद्धीचा मार्ग दाखवणाऱ्या ...

आणि

.... मनात अजूनही जिवंत वास करत असलेल्या -

जी. ए. कुलकर्णी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन ... करण्यासाठी सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या जनशताब्दीवर्षानिमित्त त्यांच्या निवडक कथांच्या अभिवाचनाचे तीन भाग आयोजित करण्यात आले. लातूर येथे असा प्रयोग प्रथमच करण्यात आला व त्याला वाचक, रसिक, स्नेहीजणांनी उदंड प्रतिसाद दिला. मराठी साहित्यात गूढकथांचे व मनगर्भ भावाभिव्यक्तींचे दालन खुले करून त्याला अभिजात वैभव प्राप्त करून देणारे नाव म्हणजे जी. ए. कुलकर्णी. भावाभिव्यक्तीबरोबरच उच्च भाषाभिव्यक्ती म्हणजे जी. ए. कुलकर्णी. माणसाच्या कल्पनांच्या, मनोव्यापाराच्या अद्भुततेचा वेध, सामान्य माणसाच्या सुखदु:खाच्या व स्वप्नपूत विचारविश्वाचीही उकल जी. एं.च्या लेखणीतून साकारत असे. मराठी साहित्याचे अभिजात सामर्थ्य घडवण्यात त्यांचे अद्वितीय योगदान आहे.

मन:पूत भावभावनांच्या आंदोलनांचे नेमके व चित्रमय शब्दरेखन असे वैशिष्ट्य असलेल्या, जी. ए. कुलकर्णींच्या कथांचे मराठी साहित्यात अजरामर असे योगदान आहे. मनोविश्वातील घडामोडींसह माणसाच्या वृत्ती, प्रकृती व विकृती यांच्यातील अद्भुततेचा वेध, सामान्य माणसाच्या सुखदु:खाच्या व स्वप्नपूत विचारविश्वाचीही उकल जी. एं.च्या लेखणीतून साकारत असे.

जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचे मराठी साहित्य विश्वात वेगळे स्थान आहे. त्यांच्या कथांतून माणसाचे सखोल व गूढ मनोविश्व शब्दांकित केलेले आढळते; तसेच नियतीने केलेल्या विचित्र व क्रूर संयोजनाची अकल्पित कहाणी असे. विशेष म्हणजे, रहस्यमयता, गूढता असूनही त्यांची तात्विक बैठक अत्युच्च पातळीची असे व

भाषालालित्याचे एक वेगळेच समृद्ध भांडार असे. त्यामुळेच जीएंच्या साहित्याचे स्थान मराठी भाषेला वेगळे वळण देणारे ठरते व त्यांचे दालन वैशिष्ट्यपूर्ण ठरते. १० जुलै, १९२३ साली जन्मलेल्या जीएंचे हे जन्मशताब्दी वर्ष त्यांच्या रसिकजनांनी वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया उपक्रमांनी साजरे करून मराठी भाषेतील हा अमोल ठेवा पुनरुज्जीवित केला.

लातूर शहरात सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या 'साहित्यविशेष' या उपक्रमांतर्गत जीएंच्या निवडक कथांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम अनेक भागांत आयोजित करण्यात आला. त्यांपैकी पहिल्या भागात दि. ३० एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता शिवाजी चौकातील ब्रिज हॉटेलच्या सभादालनात, या कार्यक्रमाच्या 'बाधा', दीपस्तंभ' व 'कवठे' या कथांचे अभिवाचन करण्यात आले. प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी केले यांच्यासह डॉ. वर्षा पाटील, अपर्णा गोवंडे, मनीषा टोपरे, महेश दास्ताने, डॉ. जयंती आंबेगावकर, कौस्तुभ जोशी, वैष्णवी कुलकर्णी या कलावंतांनी हे अभिवाचन साकारले. दृक्श्राव्य माध्यमांचा वापर करत संपन्न झालेल्या या अभिवाचनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले.

दुसऱ्या भागात दि. ४ जून एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता या कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात 'लीला' व 'भोवरा' या कथांचे अभिवाचन करण्यात आले. प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी, दस्तगीर शेख, भाग्यश्री कुलकर्णी, वैष्णवी कुलकर्णी, यशवंत कुलकर्णी, उमा व्यास, सुनीता देशमुख, व संजय अयाचित या कलावंतांनी हे अभिवाचन साकारले.

तिसऱ्या भागात दि. ९ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजता या कार्यक्रमाच्या 'मत्स्यकन्या' व 'वीज' या कथांचे अभिवाचन करण्यात आले. प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी, अपर्णा गोवंडे, दस्तगीर शेख, कौस्तुभ जोशी, महेश दास्ताने, सुवर्णा बुरांडे, प्रा. अरुणा देशपांडे व डॉ. अनघा राजपूत या कलावंतांनी हे अभिवाचन साकारले. या अभिवाचनाने रसिकांची मने अक्षरश: जिंकली.

या कार्यक्रमासाठी विशेष अनवट व सादरीकरणास आव्हानात्मक अशा कथांची निवड करताना त्यांच्यातील नाट्यमयता, भाषाशैली, विषय व कथावस्तूचे वैविध्य, जीएंना कदाचित साधारणपणे अभिप्रेत असलेले संदेश, मानसिक संस्कार व त्यांतून साधता येणारे समाजसंस्कार अशा अनेक विविध निकषांनुसार या कथांची निवड करण्यात आली. कथांच्या निवडीबरोबरच सादरीकरणानुकूल संपादन, संगीत नियोजन व दिग्दर्शन प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे समन्वयक प्रा. मनोहर कबाडे, प्रा. डॉ. सौ. संपदा कुलकर्णी-गिरगावकर,

पुरुषोत्तम भांगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर कलावंत, रंगकर्मी, साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित असत.

या तीनही भागांतील अभिवाचनाचे थेट प्रसारणही समाजमाध्यमावरून करण्यात आले होते. त्यामुळे त्याचा असंख्य रसिकांना लाभ घेता आला. या उपक्रमास रसिकांनी वाढत्या संख्येने प्रतिसाद दिला व जीएंच्या साहित्याचा लातूरकरांना अक्षरश: लळा लावला. अभिवाचनाच्या आगळयावेगळया शैलीचाही परिचय त्यानिमित्ताने लातूरकरांना अनुभवता आला. याशिवाय, सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या अधिकृत संकेतस्थळावर या सर्व कथांच्या अभिवाचनाच्या संपादित चित्रफिती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

त्यापैकी 'वीज' या कथेच्या अभिवाचनाचा दुसरा प्रयोग लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयात, मराठी विभागाच्या वतीने, अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ जुलै रोजी आयोजित करण्यात आला. मराठी विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले व अनिमेशन विभागाच्या प्रा. डॉ. दुर्गा शर्मा यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी या उपक्रमाचे व कार्यक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या व अशा वाचनसंस्कृतीपूरक कार्यक्रमांचे आयोजन ही काळाची गरज असल्याचे विशद केले. त्यांच्या व प्रा. सुभाष कदम यांच्या हस्ते सर्व कलावंतांचे स्वागत करण्यात आले. सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने कार्यवाह प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी दोन्ही आयोजक संस्थांचे आभार मानले.

अनेकांनी या अभिवाचनाची प्रशंसा केली. अशा प्रकारच्या कार्यक्रमांची गरज असल्याचे अनेकांनी बोलून दाखवले. त्यामुळे आणखीन वेगवेगळया व अनवट कथांचा समावेश असलेल्या सर्व भागांना मिळणारा चांगला प्रतिसाद वाढतच गेला. सद्यकाळात, विशेषत: नव्या पिढीच्या वाचनसंस्कृतीस पोषक अशा या प्रकारच्या कार्यक्रमांची गरज असल्याचे मत रसिकांनी व्यक्त केले.